■ अहिल्यानगर ■ बुधवार, दि. ४ जून २०२५ ■ वर्ष ६ वे ■ अंक ५१ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

।। श्री ।।
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com



# १७ वर्षानंतर आरसीबी आयपीएलचा नवा चॅम्पियन

## स्वप्नपूर्तीनंतर विराटच्या डोळ्यात आनंदाश्रू । पंजाब किंग्ज ठरला उपविजेता

● **नवी दिल्ली । वीरभूमी–**
आरसीबीने अखेर १८ व्या वर्षी आयपीएलची ट्रॉफी जिंकली आणि विराट कोहलीचे स्वप्न साकार झाले. आरसीबीने पंजाब किंग्सवर आयपीएलच्या फायनमलध्ये ६ धावांनी विजय साकारला आणि त्यांनी प्रथम विजेतेपदाला गवसणी घातली. यावेळी विराट कोहलीला अश्रू अनावर झाले. दुसरीकडे पंजाब किंग्जनेही आक्रमक फलंदाजी केली. एकानंतर एक फलंदाज परतत असताना शशांक सिंगने चांगलीच झुंज दिली. परंतु थोडक्यात पंजाब किंग्जला सामना गमवावा लागला.

आरसीबीने प्रथम फलंदाजी करताना १९० धावा केल्या होत्या. आरसीबीच्या आव्हानाचा पाठलाग करताना पंजाबची सुरुवात चांगली झाली. मात्र, त्यानंतर त्यांचे फलंदाज ठराविक फरकाने बाद होत राहिले. त्यामुळे हा सामना कोण जिंकेल, हा प्रश्न सर्वांनाच पडला होता. पण आरसीबीने अचूक आणि भेदक मारा करत सामन्यावर वरचष्मा निर्माण केला. अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर आज आरसीबीविरुद्ध पंजाब किंग्ज यांच्यात आयपीएल २०२५ मधील अंतिम सामना रंगला.

या सामन्यात पंजाबचा कर्णधार श्रेयस अय्यर याने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर निर्धारित २० षटकांत बंगळुरूने ९ बाद १९० धावांपर्यंत मजल मारली. या सामन्यात पंजाबच्या काईल जेमिसन आणि अर्शदीप सिंगने प्रत्येकी ३ बळी घेत आरसीबीचे कंबरडे मोडले होते. यात बंगळुरूकडून विराट कोहलीने सर्वाधिक ४३ धावा जमवल्या, तर त्याला कर्णधार रजत पाटीदार (२६), जितेश शर्मा (२४), लियाम लिव्हिंगस्टन (२५), मयंक अग्रवाल (२४) या चौघांनी चांगली साथ दिली. त्यामुळे आरसीबीला १९० धावांपर्यंत मजल मारता आली. पंजाब किंग्जच्या गोलंदाजांनी टिच्चून गोलंदाजी करीत आरसीबीला २०० च्या आत रोखले. त्यानंतर मैदानात उतरलेल्या पंजाब किंग्जची सुरुवात चांगली झाली. परंतु ठराविक अंतराने विकेट गमावल्याने पंजाबच्या संघ बॅकफूटवर आला तरीही शशांक सिंग अखेरपर्यंत झुंजला. परंतु त्याला पंजाबला विजय मिळवून देता आला नाही.

## SPOT NEWS

### एसटी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ७ टक्के वाढ

● **मुंबई** – राज्य परिवहन महामंडळाच्या म्हणजेच एसटीच्या कर्मचाऱ्यांना मूळ वेतनावरील महागाई भत्त्यात ७ टक्क्यांनी वाढ करण्यात येत आहे. त्यानुसार एसटी कर्मचाऱ्यांना जून २०२५ पासून ४६ टक्क्यांऐवजी ५३ टक्के महागाई भत्ता अदा करण्यात येईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी येथे केली. महामंडळातील कर्मचाऱ्यांना महात्मा फुले जनआरोग्य योजना किंवा धर्मवीर आनंद दिघे वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना यापैकी एक निवडण्याचा पर्याय, एक कोटी रुपयांचे अपघाती विमा कवच लागू करण्याचा, तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मोफत प्रवास पास ९ ऐवजी १२ महिन्यांसाठी देण्याचा निर्णयही शिंदे यांनी घोषित केला.

### अखेर सीबीएसईच्या शाळांना शासन निर्णय मान्य

● **पुणे** – सीबीएसईशी संलग्न शाळांनी उन्हाळ्याच्या सुट्या संपवून शाळा सुरू करण्याचा दिवस त्यांच्या सोयीने ठरविला आहे. त्यामुळे एकाच परिसरातील शाळा सुरू करण्याच्या तारखा वेगवेगळ्या झाल्या आहेत. वृत्त दिल्यानंतर काही शाळांनी त्यांचा निर्णय बदलला असून राज्य शासनाच्या परिपत्रकानुसार १६ जून रोजी शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. तसा मेसेजही शाळेने पालकांच्या अधिकृत व्हॉट्सअप ग्रुपवर टाकला आहे.राज्यातील सर्व शाळा १६ जून रोजी सुरू करण्याचा आदेश शालेय शिक्षण विभागाने दिला होता. त्यानुसार एसएससी पॅटर्नच्या शाळांनी १६ जून रोजी शाळा सुरू करण्याची तयारी केली. मात्र, दुसरीकडे सीबीएसई संलग्न शाळांनी राज्य शासनाच्या आदेशाला बासनात गुंडाळले असून त्यांच्या सोयीनुसार शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला आणि २ जूनपासून ते २१ जूनपर्यंत विविध तारखांना शाळा सुरू करण्याची सूचना पालकांना दिली आहे. सीबीएसईचे पॅटर्ननुसार शाळा सुरू करणार असल्याचे कारण या शाळांनी सांगितले असले तरी 'सीबीएसई' तरी शाळांना वेगवेगळ्या तारखा दिलेल्या नाहीत. केंद्रीय विद्यालयांना मात्र २१ जून रोजी शाळा सुरू करण्याच्या सूचना असल्याने पुण्यातील सर्व केंद्रीय विद्यालये २१ जून रोजी सुरू होणार आहेत.

## पहिलीपासून सैनिकी शिक्षण

● **मुंबई । वीरभूमी–**
राज्यात आता इयत्ता पहिलीपासूनच लष्कराचे बेसिक प्रशिक्षण देण्यात येणार आहे. राष्ट्रभक्तीची भावना लहान वयातच दृढ होण्यासाठी हे पाऊल टाकण्यात येत आहे. राज्यातील विद्यार्थ्यांना पहिलीपासूनच सैनिकी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. राष्ट्र प्रथम ही भावना रुजवण्यासाठी हे पाऊल टाकण्यात येत असल्याची माहिती समोर येत आहे.



दरम्यान, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी नाशिकमध्ये एका जाहीर कार्यक्रमात याविषयीची घोषणा केली आहे. माजी सैनिक, क्रीडा शिक्षक, राष्ट्रीय कॅडेट कोर (एनसीसी) स्काऊट-गाईड्स हे विद्यार्थ्यांना लष्करी प्रशिक्षण देतील. त्यासाठी राज्यातील २.५ लाख माजी सैनिकांची मदत घेणार असल्याचे भुसे म्हणाले.

इयत्ता पहिलीपासून मूलभूत सैनिक प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशावर प्रेम करणे, नियमित स्वरूपात शारीरिक व्यायाम करणे आणि शिस्त लगावी यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचा विद्यार्थ्यांना फायदा होईल. अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिली. तर याविषयीच्या प्रस्तावावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिक्रिया दिल्याचे ते म्हणाले.

जिल्हा परिषदेच्या ४८ शिक्षकांना नुकतेच सिंगापूर या देशाच्या अभ्यास दौऱ्यावर पाठवण्यात आले होते. सिंगापूरमधील शिक्षण व्यवस्थेत राष्ट्र प्रथम ही संकल्पना आढळून आली. त्यामुळे हाच दुवा पकडत राज्यातही राष्ट्र प्रथम ही संकल्पना इयत्ता पहिलीपासूनच राबवण्यात येणार आहे. त्यासाठी इयत्ता पहिलीपासूनच सैनिकी प्रशिक्षण देण्यात येणार असल्याची माहिती शिक्षणमंत्री भुसे यांनी दिली.

विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीलाही प्राधान्य दिले जाणार आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांचे हेल्थ कार्ड तयार करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे, अशी माहिती भुसे यांनी दिली. इयत्ता पहिलीपासून मूलभूत सैनिक प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशावर प्रेम करणे, नियमित स्वरूपात शारीरिक व्यायाम करणे आणि शिस्त लागावी यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचा विद्यार्थ्यांना फायदा होईल, असे दादा भुसे म्हणाले.

## राज्यातील जनावरांचे बाजार आठवडाभर बंद?

● **मुंबई । वीरभूमी–**
बकरी ईद अवघ्या काही दिवसांवर असताना महाराष्ट्र गोसेवा आयोगाने घेतलेल्या एका निर्णयामुळे राज्यभरात नवा वाद उफाळला आहे. आयोगाने ३ जून ते ८ जून या कालावधीत राज्यातील सर्व जनावरांचे बाजार बंद ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. यामुळे मुस्लिम समाजासह शेतकरी, हमाल, दलाल, विक्रेते आणि कुरेशी समाजात संतापाची लाट उसळली आहे.

गोसेवा आयोगाच्या परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे की, बकरी ईदच्या निमित्ताने जनावरांची मोठ्या प्रमाणावर कत्तल केली जाते. अशा पार्श्वभूमीवर गायी व बैलांची बेकायदा कत्तल टाळण्यासाठी बाजारच बंद ठेवावेत, जेणेकरून कायद्याचे उल्लंघन होणार नाही. महाराष्ट्रात गोवंश हत्या बंदी कायदा लागू असून त्याअंतर्गत गाय व बैलांची कत्तल तसेच गोमांस बाळगणे हा दखलपात्र गुन्हा आहे.

मात्र, या निर्णयामुळे केवळ गायी-बैलच नव्हे तर शेळी, मेंढी आणि म्हशींचीही विक्री आठवडाभर ठप्प होणार आहे. बकरी ईदच्या सणामुळे या काळात शेळी-मेंढी विक्रीला विशेष मागणी असते. त्यामुळे बाजार बंद केल्यास लाखो शेतकरी आणि विक्रेत्यांचे मोठे नुकसान होणार आहे.

वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष फारूख अहमद यांनी या बंदीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. गोसेवा आयोगाला बाजार बंद




ठेवण्याचे अधिकारच नाहीत. त्यांचे कार्य केवळ शिफारसीपुरते मर्यादित आहे. त्यांनी कोणत्या अधिकारात हा निर्णय घेतला? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला. या निर्णयामुळे शेतकरी, हमाल, चालक, मजूर, कुरेशी समाज यांच्या उपजीविकेवर परिणाम होणार आहे. शेळी-मेंढी या कायद्यात येत नसलेल्या प्राण्यांच्या विक्रीवरही बंदी का? असा संतप्त प्रश्नही उपस्थित केला.

गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी स्पष्टीकरण देताना म्हटले की, ही बंदी केवळ ३ ते ८ जून या कालावधीसाठीच आहे. परिपत्रक केवळ बाजार समित्यांना सूचना देण्यासाठी काढण्यात आले आहे. महाराष्ट्रात एकूण ३०५ मुख्य व ६०३ दुय्यम कृषि उत्पन्न बाजार समित्या आहेत आणि २९२ ठिकाणी जनावरांचे बाजार भरतात. पावसाळ्याच्या तोंडावर हे बाजार शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे असतात. शेतकरी येथे जनावरांची विक्री करून शेतीसाठी आवश्यक खते, बियाणे, औषधे आणि जनावरांचे खाद्य खरेदी करतात.

# केंद्र सरकारच्या निर्णयाने कांदा उत्पादक संकटात?

## केंद्र सरकारकडून परताव्याची सवलत बंद । निर्यात प्रोत्साहन अनुदान पुन्हा सुरू करण्याची मागणी



● **नाशिक । वीरभूमी–**
केंद्र सरकारच्या निर्णयाचा कांदा उत्पादक शेतकऱ्यांना पुन्हा फटका बसणार असल्याची चिन्हं आहेत. कारण निर्यात प्रोत्साहन योजने अंतर्गत कांदा निर्यातदारांना मिळणारी १.९ टक्के परताव्याची सवलत सरकारने बंद केली असल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे निर्यातीला मिळणारे प्रोत्साहन कमी होऊन कांद्याची मागणी कमी होण्याची शक्यताही शेतकरी वर्गातून व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, देशांतर्गत बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात कांदा पीक असल्याने बाजारभाव कोसळत आहेत. त्यामुळे सरकारने कांदा निर्यातीला प्रोत्साहन देण्याची मागणी कांदा उत्पादक शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

दरम्यान, मोदी सरकारच्या या निर्णयामुळे कांदा उत्पादकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता असल्याने केंद्र सरकारने निर्यात प्रोत्साहन अनुदान रद्दचा निर्णय मागे घ्यावा. तसेच १० टक्के निर्यात प्रोत्साहन अनुदान द्यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे अध्यक्ष भारत दिघोळे यांनी केली आहे. तसेच ही मागणी मान्य न झाल्यास राज्यभर तीव्र आंदोलन केले जाणार, असा इशाराही दिघोळे यांनी दिला आहे. त्यामुळे आगामी काळात कांदा प्रश्न अधिक चिघळतो की त्यावर सरकारकडून काही तोडगा निघतो हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

नाशिक जिल्ह्यात ६ मे पासून सातत्याने ३ आठवडे पाऊस झाला आहे. शेतकऱ्याचे यात मोठे नुकसान झाले आहे. द्राक्षाची धारणा होणे अशक्य आहे. तसेच डाळिंबाबाबतही आहे. पावसाने चाळीतील कांदा खराब झाला आहेच सोबतच शेतात असलेला कांदाही वाहून गेला आहे. भाजीपाल्याचीही तीच अवस्था असल्याची प्रतिक्रिया स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी दिली आहे.

### टोमॅटो आणि कांद्याची आवक वाढली

■ नाशिकच्या पिंपळगाव बसवंतमध्ये मोठ्या प्रमाणात टोमॅटो आणि कांद्याची आवक होत असते. दरम्यान, व्यापा-यांनी टोमॅटोची खरेदी करून देखील पैसे दिले नसल्याने शेतकरी आक्रमक झाले आहेत. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, पिंपळगाव बसवंत या बाजार समितीच्या अंतर्गत व्यापा-यांनी टोमॅटोची खरेदी केली होती. मात्र, त्यांनी शेतक-यांची तब्बल अडीच कोटी रुपयांची देणी थकवली आहेत. त्यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. दरम्यान, आंदोलन सुरू झाल्यावर व्यापारी काही निर्णय घेतात का हे पाहणे देखील महत्त्वाचे ठरणार आहे.

# SPOT NEWS

## पर्यावरणदिनी पर्यावरण परिषदेचे आयोजन

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त तालुक्यातील इसळक येथे ग्रामीण भागातील पहिल्या पर्यावरण परिषदेचे आयोजन आत्मनिर्धार फाउंडेशन संचलित पर्यावरण संवर्धन समितीच्या पुढाकाराने करण्यात आले आहे. या परिषदेचे उद्घाटन जागतिक कीर्तीच्या पर्यावरण तज्ञ डॉ. प्रियदर्शिनी कर्वे यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती पर्यावरण संवर्धन समितीचे अध्यक्ष भानुदास कोतकर यांनी दिली. या परिषदेत 'वॉटरमॅन' अशी ओळख प्राप्त झालेले पर्यावरणप्रेमी रमेश खरमाळे, उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, सामाजिक वनीकरणचे विभागीय वनअधिकारी सचिन कंद आदी मार्गदर्शन करणार आहेत. सध्या वातावरणात होत असलेले बदल आणि त्यामुळे येणारी अस्मानी संकटं, तापमान वाढ, पर्यावरणाचा ऱ्हास आणि त्यावरील उपाययोजना आदी मुद्द्यांवर या परिषदेत चर्चा केली जाणार आहे, अशी माहिती अ‍ॅड. राहुल ठाणगे यांनी दिली. पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने अमित गायकवाड, प्रा. डॉ. महेबूब सय्यद, डॉ. प्राजक्ता ठुबे, डॉ. नागेश शेळके, सचिन मोहन चोभे,ह.भ.प.सिद्धनाथ मेटे, किसन आटोळे, कॉ. भैरवनाथ वाकळे, संदीप जाधव, संतोष घोलप आदींसह जिल्ह्यातील पर्यावरणप्रेमी चर्चासत्रात सहभागी होणार आहेत. जागतिक पर्यावरणदिनी गुरुवारी सकाळी ९.३० वा. पर्यावरण परिषदचे उद्घाटन डॉ. कर्वे यांच्या हस्ते होईल. उद्घाटन सत्रानंतर, जिल्यातील पर्यावरणप्रेमी, निसर्गप्रेमींचे चर्चासत्र पार पडणार आहे.

## ढोकेश्वर विद्यालयाच्या प्राचार्यपदी बाळासाहेब खिलारी

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, अहिल्यानगर या नामांकित शिक्षण संस्थेचे, श्री ढोकेश्वर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय, टाकळी ढोकेश्वर या विद्यालयाच्या प्राचार्य पदी संस्थेने टाकळी ढोकेश्वर गावचे सुपुत्र श्री. बाळासाहेब खिलारी सर यांची पदोन्नतीने १ जून २०२५ पासून नियुक्ती केली आहे. याप्रसंगी श्री. बाळासाहेब खिलारी यांच्याशी संपर्क केला असता, त्यांनी सांगितले की, मी गेले २८ वर्षापासून या संस्थेच्या नेवासा, पारनेर, टाकळी ढोकेश्वर, गोरेगाव येथील विद्यालयात उपशिक्षक म्हणून हिंदी विषयाचे अध्यापन केले आहे. १ जानेवारी, २०२५ पासून या विद्यालयात पर्यवेक्षक पद सांभाळले. आणि एक जून पासून या विद्यालयाच्या प्राचार्य पदी संस्थेने, माझ्यावर विश्वास दाखवून पदोन्नतीने नियुक्ती केली आहे. याबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रा. ह. दरे साहेब, सेक्रेटरी मा. श्री. विश्वासराव आठरे पा. साहेब, उपाध्यक्ष मा. श्री. डॉ. विवेक भापकर साहेब, सहसेक्रेटरी श्री. जयंतराव वाघ साहेब, खजिनदार मा. अ‍ॅडवोकेट दीपलक्ष्मी म्हसे मॅडम, संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त मा. श्री. नंदकुमार झावरे पा. साहेब, मा. श्री सिताराम खिलारी पा. साहेब, संस्थेच्या गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य मा. श्री. डॉ. भाऊसाहेब खिलारी साहेब व सर्व पदाधिकारी यांचा मी अत्यंत ऋणी आहे. पुढे ते म्हणाले की, या विद्यालयाची गुणवत्ता व जो नावलौकिक आहे. तो अधिक वाढविण्यासाठी मी प्रामाणिकपणे प्रयत्न करणार आहे. संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त श्री. सिताराम खिलारी उर्फ अण्णा व गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी यांचे विद्यालयास नेहमीच मोलाचे मार्गदर्शन असते. याचा नक्कीच विद्यालयाच्या दृष्टीने फायदा होणार आहे.

# काळे कारखान्यांकडून शेतकऱ्यांच्या खात्यावर १०.६४ कोटी जमा

### आ. आशुतोष काळे । दुसरा हफ्ता १५० रुपये प्र.मे.टन व ठिबक अनुदान १०० प्रमाणे प्र.मे.टन बँक खात्यात वर्ग

**● कोपरगाव । वीरभूमी –**

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना वेळेवर अर्थसहाय्य करण्याची मा. खा. कर्मवीर शंकररावजी काळे साहेब यांच्यापासून सुरू झालेली परंपरा आजतागायत कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याने जपली असून ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विश्वास संपादन केला आहे. हा विश्वास सार्थ ठरवतांना गाळप हंगाम २०२४–२५ मध्ये कारखान्यास ऊस पुरवठा केलेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना १५० रुपये प्र.मे.टन ऊस दराचा दुसरा हप्ता व यापूर्वी जाहीर केलेले ठिबक सिंचनचे अनुदान ठिबक सिंचनने ऊस उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांना १०० रुपये प्र.मे.टन अनुदान देण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेवून सदरची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन आ.आशुतोष काळे यांनी दिली आहे.




यावर्षी गाळप हंगाम २०२४–२५ मध्ये कारखान्याने प्रतिकूल परिस्थितीत १२१ दिवस चाललेल्या गळीत हंगामात ६ लाख ५८ हजार ५०० मे.टन ऊसाचे गाळप करून ७ लाख ३४ हजार ४५० क्विंटल साखर पोती उत्पादन घेवून चालू गळीत हंगाम यशस्वीरित्या पूर्ण केला आहे. गळीत हंगाम २०२४–२५ मध्ये ज्या शेतकऱ्यांनी ऊस पुरवठा केलेला आहे त्यांना पहिली उचल प्र.मे.टन रुपये २,८०० रुपये याप्रमाणे यापूर्वीच अदा करण्यात आलेली आहे.

जून महिन्यामध्ये खरीप हंगामाची सुरुवात होत असल्यामुळे शेतकऱ्यांना बी–बियाणे खरेदी करून पेरणी करता यावी तसेच मुलांच्या शाळा उघडल्याने वह्या पुस्तके खरेदीसाठी आर्थिक हातभार मिळावा याकरिता द्वितीय हप्ता रक्कम १५० रुपये प्र.मे. टन देण्याचा व ठिबक सिंचन अनुदान १०० रुपये प्र.मे. टन देण्याचा निर्णय नुकताच संचालक मंडळाने घेतला असून जवळपास १०.६४ कोटी रुपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केले असल्याची माहिती आ.आशुतोष काळे यांनी दिली आहे.

कारखाना कार्यक्षेत्रासह राज्यभर मे महिन्यात अवकाळी पावसाने लावलेली हजेरी त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. खरीप हंगामाची तयारी करण्यासाठी आवश्यक असलेली आर्थिक मदत ऊस उत्पादक शेतकऱ्यांना कर्मवीर शंकरराव काळे कारखान्याने वेळेत दिल्यामुळे खरीप हंगामाची तयारी करण्यासाठी मोठी मदत होणार आहे. जून महिन्यात शाळा महाविद्यालय सुरू होत असतात. त्यामुळे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य खरेदीसाठी देखील मोठी मदत होणार आहे. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकरी सभासदांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

> ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे हित जोपासण्याची कर्मवीर शंकरावजी काळे साहेबांची शिकवण व आदर्श विचारसरणी डोळ्यासमोर ठेवून माजी आमदार अशोकराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक मंडळ कारखान्याचे कामकाज करीत आहे. आगामी गळीत हंगाम २०२४–२५ करिता शेतकऱ्यांनी आपल्याकडील जास्तीत जास्त ऊस कारखान्यास देऊन सहकार्य करावे. चालू वर्षी चांगले पर्जन्यमान होईल असा हवामान खात्याचा अंदाज आहे. ज्या शेतकऱ्यांकडे पाण्याची उपलब्धता आहे त्या शेतकऱ्यांनी आडसाली ऊस लागवडी कराव्या.
>
> **– आ. आशुतोष काळे**

## अहिल्यादेवी यांच्या ३०० व्या जयंती निमित्ताने गौरव गीत लोकार्पण

**● नगर । वीरभूमी –**

पूर्वाश्रमीचे अहमदनगर नाव असलेल्या जिल्ह्याचे नामांतर नुकतेच अहिल्या नगर असे करण्यात आले. अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्ताने जिल्ह्या चा वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

गेल्या काही महिन्यापासून जिल्ह्याच्या नामांतराप्रित्यर्थ अनेक निरनिराळे उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. दिनांक २७ मे २०२५ रोजी अहिल्यानगर च्या शीर्षक गीताने दमदार दिमाखदार पाऊल टाकत निघालेल्या शोभायात्रेला ऐतिहासिकत्व बहाल केले. हे अभूतपूर्व गौरव गीत पार्श्वगायिका अपूर्वा निषाद आणि पार्शवगायक रोहित राऊत यांनी फार ताकदीने गायले आहे.

याप्रसंगी अपूर्वा निषाद बोलत असताना म्हणाल्या की, माझ्या जिल्ह्याचे शीर्षक गीत गाण्याचे भाग्य मला लाभले आणि अल्प कालावधीत हे गीत लोकप्रिय झाले यामागे अहिल्यादेवींचेच आशीर्वाद आहेत.

यावेळी माननीय पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते पार्श्वगायिका अपूर्वा निषाद यांचा सत्कार करण्यात आला. त्यांनी या गौरव गीताचे प्रचंड प्रमाणात कौतुक व्हावे, हे जिल्ह्याचे गौरव गीत म्हणण्यापेक्षा प्रत्येकाने हे माझे गाणे म्हणावे असे आवाहन केले.

विचार भारती आणि जनसेवा फाऊंडेशन यांनी एकत्र येऊन निर्माण केलेल्या या गीताचे निर्माते माननीय गौतम मुनोत, संगीतकार डॉ.निरज करंदीकर, गीतकार पोलिस निरीक्षक संजय धोत्रे यांच्या अथक परिश्रमातून साकारलेले हे गौरव गीत लोकप्रिय झाले आहे.

## 'वाचन आवड सांस्कृतिक मंच'च्या अध्यक्षपदी महादेव कौसे बिनविरोध

**● पाथर्डी । वीरभूमी–**

वाचन आवड सांस्कृतिक मंच पाथर्डीच्या अध्यक्षपदी महादेव कौसे यांची तर संदीप काळे यांची सचिवपदी बिनविरोध निवड करण्यात आली. वाचन आवड सांस्कृतिक मंचचे मुख्य समन्वयक तथा संस्थापक आदर्श शिक्षक भाऊसाहेब गोरे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारिणीची सहविचार सभा पार पडली.



मराठी भाषा प्रचार व प्रसार तसेच भाषा संवर्धन करण्यासाठी काम करणारे वाचन प्रेमी या वेळी उपस्थित होते. मराठी भाषेतील साहित्य मनाला आनंद देणारे आहेत. वाचन प्रेमी नागरिकांना वाचनाची गोडी लावली जाते तसेच थोर विचारवंत, साहित्यिक, कवी, लेखक यांच्या साहित्यकृती बद्दल नागरिकांना माहिती दिली जाते.१५ आक्टोबर २०१४ रोजी स्थापन झालेल्या या मंचाचे कार्याबद्दल व एकंदर आतापर्यंतच्या कार्याचा आढावा सुनिल कटारिया यांनी घेतला. नूतन अध्यक्ष महादेव कौसे म्हणाले की, नवीन पिढी वाचनापासून दुरावत चालली आहे, त्यांना वाचनाची गोडी लावून, सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करून, भाषा संवर्धनासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातील. विविध क्षेत्रातील नावाजलेल्या कलाकृतीबद्दल वाचकांना माहिती दिली जाईल. त्याबद्दल विचारमंथन होईल. वाचन चळवळ आणखी सर्व सामान्यांपर्यंत पोहोचण्यासाठी नवीन कार्यकारिणी यांनी पुढाकार घेऊन प्रयत्न करावेत अशी अपेक्षा मुख्य समन्वयक भाऊसाहेब गोरे यांनी व्यक्त केली. यावेळी नुतन कार्यकारणी जाहीर करण्यात आली. प्रसिद्धी प्रमुख अमोल कांकरिया यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त अहिल्यादेवीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. पाथर्डी तालुक्यात इयत्ता १२ वी मध्ये प्रथम आलेल्या सार्थक विठ्ठल देशमुख या विद्यार्थ्यांचा व पालकांचा सन्मान करण्यात आला. शिवाजी बडे यांनी आभार मानले.

# अवकाळी नुकसानीकडे लोकप्रतिनिधीसह प्रशासनाचे दुर्लक्ष

### अकोले तालुक्यातील ४० गाव डांगाणातील पिकांचे नुकसान । पिकांची रोपे देण्याची मागणी

**● अकोले । वीरभूमी–**

अवकाळी पावसाने ४० गाव डांगाणातील शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केलेले असून याकडे लोकप्रतिनिधी, शेतकरी नेते, प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे. तरी प्रशासनाने पिकांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी व पिकांची रोपे शेतकऱ्यांना थेट द्यावी, अशी मागणी आदिवासी शेतकऱ्यांनी केली.

यावेळी रतनवाडी सोसायटी चे चेअरमन नरहरी इदे, संतोष सोडणर, भाऊराव भांगरे, राजू मधे, नामदेव इदे, पांडुरंग पदमेरे, मच्छिंद्र खाडे, मुकणे बाबा आदी शेतकऱ्यांनी ही मागणी केली.



अकोले तालुका हा आदिवासी व डोंगराळ तालुका असून येथे पावसाळ्यात पावसाचे प्रमाण जास्त असते. मात्र यावर्षी भर उन्हाळ्यात जवळपास एक महिना अवकाळी पाऊस पडल्याने ४० गाव डांगाणातील आदिवासी भागातील शेतकऱ्यांनी आपल्या शेतामध्ये भुईमूग, ज्वारी, बाजरी ही पिके लावली. मात्र त्यांचे या अवकाळी पावसाने मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. भात पेरणी थांबली व ज्यांनी पेरणी केली ती भातांची रोपे सडली आहेत.

इतक्या मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांचे नुकसान होऊनही प्रशासनाने याकडे लक्ष दिले नाही. साधी चक्करही मारली नाही. लोकप्रतिनिधीनीही याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे. त्यामुळे आम्हाला कोणी वाली आहे की नाही? असा सवाल आदिवासी शेतकरी उपस्थित करताना दिसत आहेत.

माजी मंत्री स्व. मधुकरराव पिचड हे त्यांच्या काळात असे काही झाले तर स्वतः नुकसानीची पाहणी करायचे, जिल्हाधिकारी, तहसीलदार यांना फोन करून पंचनामे करायला लावायचे व नुकसान भरपाई मिळवून द्यायचे याची आठवण यावेळी आदिवासी शेतकऱ्यांनी काढली.

यावेळी पिकांचे झालेल्या नुकसानीचे प्रशासनाने तातडीने पंचनामे करावेत व शेतकऱ्यांना थेट भात रोपे द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी यावेळी केली. व रोपे जर दिली नाहीतर शेती ओसाड पडणार आहे, असेही स्पष्ट केले.

भात पेरणी ही रोहिण्या निघाल्या की लगेच केल्या जातात. परंतु यावर्षी अवकाळी पावसामुळे रोपे तयार करण्यासाठी जी शेते आहेत तिथे भुजनी झाली नाही व शेत पूर्ण पाण्याने भरली आहेत. यामुळे जमिनीला वापसा राहिला नाही. यामुळे शेतकरी खुप मोठ्या अडचणीत आला आहे.

## कोतवाली पोलिसांकडून झेंडीगेट येथे छापा टाकून ३५० किलो गोमांस जप्त

**● नगर । वीरभूमी –**

कोतवाली पोलिसांनी झेंडीगेट परिसरात कारवाई करून साडेतीनशे किलो गोमांस जप्त केले. या प्रकरणी एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. २ रोजी दुपारी एकच्या सुमारास पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना गोपनीय माहिती मिळाली की, आंबेडकर चौक, झेंडीगेट येथे एका पत्र्याच्या शेडमध्ये वसीम बशीर शेख हा महाराष्ट्र शासनाने बंदी केलेल्या तसेच कोणत्याही पशु वैद्यकीय अधिकऱ्याकडुन पूर्व तपासणी न करता लोकांच्या आरोग्यास धोका उत्पन्न होईल अशा पध्दतीने गोवंशीय जनावरांच्या मांसाची विक्री करण्याकरिता त्यांची कत्तल करीत आहे. त्यांनी तात्काळ गुन्हे शोध पथकाला सूचना केल्या. पथकाने दुपारी दीडच्या सुमारास छापा टाकून ७० हजार रुपये किमतीचे साडेतीनशे किलो गोमांस, एक सत्तूर व सुरी असा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी आरोपी वसीम बशीर शेख (वय ३६ वर्षे, रा. घासगल्ली, कोठला झोपडपट्टी) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २७१, महाराष्ट्र प्राणी रक्षा अधिनियम सन १९९५ चे सुधारीत सन २०१५ चे कलम–५ (अ), ५ (क), ९, ९ (अ), तसेच प्राण्यांना क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध करणेबाबत अधि. १९६० चे कलम ११, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम–११९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास मपोहेकॉ. रोहिणी दरंदले करीत आहेत. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, गुन्हे शोध पथकाचे मपोहेकॉ. रोहिणी दरंदले, पोहेकॉ. ए..पी. इनामदार, पोकॉ दीपक रोहोकले, तानाजी पवार, सुरज कदम, शिरीष तरटे, दत्तात्रय कोतकर, सचिन लोळगे, सोमनाथ राऊत, मपोकॉ. प्रतिभा नागरे यांच्या पथकाने केली.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS



## वह्यांचे वाटप करुन दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभीच सामाजिक कार्यकर्ते व ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी सामाजिक जाणीव ठेवून दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी वह्यांचे वाटप करून शैक्षणिक मदतीचा हात पुढे केला. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ व धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने सावली दिव्यांग संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब महापुरे यांच्याकडे दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी वह्यांचे संच सुपूर्त करण्यात आले. पै. नाना डोंगरे म्हणाले की, शिक्षण हा प्रत्येक मुलाचा मूलभूत हक्क आहे. आर्थिक व शारीरिक अडचणीमुळे कोणीही शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी संस्थेच्या माध्यमातून हा छोटासा प्रयत्न आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांना योग्य सुविधा मिळाल्यास ते निश्चितच उज्वल यश प्राप्त करू शकतात. समाजातील प्रत्येक व्यक्तीने अशा गरजू मुलांच्या शिक्षणासाठी पुढे येणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. बाबासाहेब महापुरे म्हणाले की, पै. नाना डोंगरे यांच्यासारखे संवेदनशील लोककार्यकर्ते दिव्यांगांना वेळोवेळी मदतीचा हात देत आहेत. त्यांच्या या मदतीमुळे अनेक दिव्यांग मुलांचा शैक्षणिक प्रवास सुलभ होत आहे. या उपक्रमामुळे मुलांमध्ये आत्मविश्वास वाढतो व समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील होण्यास प्रेरणा मिळत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## विविध समस्यांचे निराकरण करावे अन्यथा उपोषण; जगताप यांचा इशारा

**● खरवंडी कासार । प्रतिनिधी–**



खरवंडी कासार येथील विविध समस्यांचे निराकरण करावे यासाठी भारतीय मराठा महासंघाचे तालुका अध्यक्ष अंबादास जगताप यांनी गुरूवार दि. ५ जुन रोजी आमरण उपोषण करण्याचा इशारा निवेदनाद्वारे ग्रामपंचायत प्रशासनाला दिला आहे. जगताप यांनी दिलेल्या निवेदनात विविध मागण्या करण्यात आल्या असून त्यामध्ये, वित्त आयोगाचा निधी २०२२ते २०२५ अखर्चित निधी, गावात घाणीचे साम्राज्य पसरले असून घंटागाडी बंद आहे. ग्रामपंचायत रिक्त पदे तात्काळ भरावीत, २०२०ते २०२५ ग्रामपंचायतचे लेखापरिक्षण करणे, व आतापर्यंत झालेल्या विकास कामाचे परिक्षण करणे,ग्रामविकास अधिकारी रोज उपलब्ध असावा, बंदिस्त गटार कामाबाबत चौकशी व्हावी. २५/१५ ग्रामविकास काम सिमेट रस्ता गणपतीमंदिर तें जुनाबाजारतळ निकृष्ठ दर्जाचे कामाची चौकशी करावी. गावात आजपर्यंत झालेल्या विकास कामाचे बॅनर लावण्यात यावे बाबत आदी समस्या संदर्भांत शासनाचे लक्ष वेधण्यासाठी दि. ५ जुन पासुन ग्रामपंचायत कार्यालय खरवंडी कासार समोर आमरण उपोषण करणार आहे सदर निवेदनाच्या प्रती तहसिलदार, पाथर्डी पंचायत समिति यांना देण्यात आल्या आहेत सर्वं समस्याचे निर्णय मार्गी लागत नाहीत तोपर्यंत ग्रामपंचायत कार्यालया समोरुन उठणार नाहीं असे शेवटी जगताप म्हणाले.

# संजीवनीने घडविले जगाच्या पाठीवर चमकणारे तारे

### सौ. स्नेहलता कोल्हे । तालुक्यातील दहावी, बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**● कोपरगाव । वीरभूमी–**

ज्ञान हा प्रत्येकाचा दागिना आहे, दहावी–बारावी शिक्षण घेवुन अभियांत्रिकी तांत्रिक शिक्षणातुन जगाच्या पाठीवर चमकणारे तारे घडविण्यांचे काम माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी संजीवनी एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमांतुन केले असे प्रतिपादन माजी आमदार सौ. स्नेहलता कोल्हे यांनी केले.

संजीवनी उद्योग समुह व संजीवनी युनिव्हर्सिटीच्या सहकार्याने तालुक्यातील दहावी बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मंगळवारी संजीवनी अभियांत्रिकी महाविद्यालयात झाला त्याप्रसंगी त्या अध्यक्षपदावरून बोलत होत्या. याप्रसंगी स्व. शंकरराव कोल्हे यांच्या प्रतिमेबरोबरच सरस्वती पुजन करण्यांत आले. संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे यांच्या संकल्पनेतुन तीस वर्षापासुन हा उपक्रम सुरू असल्याचे सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष विवेक भैय्या कोल्हे यांनी यावेळी सांगितले.

संजीवनी विद्यापिठाचे कुलगुरू डॉ. ए. जी. ठाकुर याप्रसंगी बोलतांना म्हणाले की, तंत्रज्ञान वेगाने विकसीत होत असुन स्टार्टअप इंडियासह देश विदेशातील औद्योगिकीकरणांला कोणत्या पध्दतीचे



अभ्यासक्रम हवे आहेत त्याचा पाया संजीवनी विद्यापीठात घातला जात आहे. मुला–मुलींना स्वतःच्या पायावर उभे राहण्यांचे शिक्षण येथे दिले जाते. दहावी बारावी नंतर काय याबाबत उच्च दर्जाचे मार्गदर्शन आणि ज्ञान शिकविले जाते.

प्रारंभी संजीवनी युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेंट अमितदादा कोल्हे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्तविक करतांना म्हणाले की, ग्रामीण भागातील मुला मुलींना के. जी. पासुन पी. जी पर्यंत तसेच पी.एच. डी चे दर्जेदार शिक्षण मिळावे हे स्वप्न माजीमंत्री स्व. शंकररावजी कोल्हे यांनी पाहिले आणि त्याच्या परिपुर्तीसाठी संजीवनी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष नितीनदादा कोल्हे यांनी काळाच्या वेगाने पावले टाकत अचूकपणाने यातील संधी शोधल्या, जागतिक स्तरावरील नासा, इस्रो, टाटा, जीओ रिलायन्स यासह देश विदेशातील महत्वाच्या पदावर संजीवनीचा विद्यार्थी काम करतो आहे याचा आम्हास अभिमान आहे. विद्यार्थ्यांनी ज्ञानाबरोबरच गुणात्मक शिक्षणाला प्राधान्य द्यावे.

माजी आमदार सौ. स्नेहलता कोल्हे पुढे म्हणाल्या की, पालकांनी कष्ट घेवुन आपल्या पाल्यांना शिकविले. दहावी बारावीत विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देण्यांसाठी संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपिनदादा कोल्हे यांच्या मार्गदर्शनातून हा कार्यक्रम संपन्न होत आहे. उच्च शिक्षण घेतांना मुला–मुलींनी योग्य अभ्यासकम व शिक्षणसंस्था निवडुन वाटचाल करावी. आयुष्यात उच्च ध्येय गाठण्यासाठी प्रत्येकाला तडजोड करावीच लागते. माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी खेड्यापाड्यातील ग्रामिण भागातुन मातीशी नाळ जोडलेल्या कार्यकर्त्यांच्या मदतींने संजीवनीचे वैभव उभे केले आहे. सुज्ञ आणि तज्ञ पिढी येथे घडली जात आहे. भविष्य आणि आयुष्याला दिशा देण्यांचे काम संजीवनी अखंडपणे करत आहे. संकटाचा कितीही मोठा ढिगारा आला तरी त्यावर उभं राहुन शेवटपर्यंत आत्मविश्वास सोडु नका, विद्यार्थ्यांनी शिक्षणांतुन आपले आई वडील गुरूजन आणि तालुक्याचे नांव मोठे करावे.

याप्रसंगी संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजचे डॉ. एम. व्ही. नागरहल्ली, के. बी. पी. पॉलिटेक्निकचे प्राचार्य ए. आर. मिरीकर, डॉ. समाधान दहिकर आदी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विविध संस्थांचे आजी माजी पदाधिकारी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार व सुत्रसंचलन प्रा. साहेबराव दवंगे यांनी केले.

## काटवन खंडोबा रोडवर पावसाचे नव्हे; तर वाहतोय ड्रेनेजचे पाणी



**● नगर । प्रतिनिधी–**

शहरातील काटवन खंडोबा रोड येथील रस्त्याचे काम सप्तपदी मंगल कार्यालय येथे मागील तीन महिन्यांपासून थांबले आहे. तीन महिन्यांपासून रस्ता खणून ठेवल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. तर जेसीबीने रस्ता खोदताना ड्रेनेजलाईन फुटल्याने सर्व घाण पाणी रस्त्यावरुन वाहत असल्याने परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरुन नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

या भागात मोठ्या प्रमाणात लोकवस्ती असून, लवकरच शाळा व पावसाळा देखील सुरु होत आहे. ठप्प झालेले काम तात्काळ सुरु करण्यासाठी नागरिकांमधून मागणी होत आहे. पावसाळा सुरु झाल्यास नागरिकांना पलीकडील भागात जाण्यास रस्ता असून देखील तो रहदारीसाठी बंद होणार आहे. तसेच शालेय विद्यार्थी व महिला वर्गाला देखील या रस्त्यावरुन वाट काढताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागणार आहे. महापालिका प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन रस्त्याचे राहिलेले शेवटच्या टप्प्यातील काम पूर्ण करण्याची नागरिकांच्या वतीने मागणी करण्यात आली आहे.

## तंत्रज्ञानाचा वापर केल्यास प्रत्येकाचे एकरी ऊस उत्पादन वाढणार : सुरेश माने

**● संगमनेर । वीरभूमी–**

माजी कृषी व महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याने कायम शेतकरी, सभासद, उत्पादक यांचे हित जोपासले आहे. कारखान्याने सातत्याने विविध योजना राबविल्या असून एकरी उत्पादन वाढविण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा व शास्त्रीय पद्धतीचा अवलंब केल्यास प्रत्येक शेतकऱ्याला नक्की लाभ होईल असा विश्वास ऊस तज्ञ सुरेश माने यांनी व्यक्त केला आहे. याचबरोबर हुमणी भुंगेरे यांचा प्रादुर्भाव जून महिन्यात कमी करता येईल असे त्यांनी सांगितले.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या वतीने निमगाव बुद्रुक, धांदरफळ, पेमगिरी येथे आयोजित ऊस विकास मेळाव्यात ते बोलत होते यावेळी व्यासपीठावर ड माधवराव कानवडे, व्हाईस चेअरमन पांडुरंग पाटील घुले, संचालक विनोद हासे, नवनाथ आरगडे, रावसाहेब दुबे, रोहिदास पवार, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर,कृषी अधिकारी भाऊसाहेब खर्डे, बाळासाहेब सोनवणे आदींसह



शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना सुरेश माने म्हणाले की, उसावर वाढलेला हुमणी अळीचा प्रादुर्भाव आपल्याला मे आणि जून महिन्यामध्ये जास्त प्रमाणात कमी करता येतो. या काळामध्ये हुमणीचे भुंगेरे बाहेर पडतात आणि ते शास्त्रशुद्ध पद्धतीने आपण अडकवले तर ते नक्की आपण कमी करू शकतो यासाठी कारखान्याने विविध उपाय योजना शेतकऱ्यांना दिले आहेत.

जास्त उत्पादन काढण्यासाठी जास्त पाणी न वापरता ठिबक सिंचन चा वापर केला आणि सेंद्रिय द्रव बरोबर उसामधील अंतर हे अत्यंत महत्त्वाचे आहे. सर्व शेतकरी जूनमध्ये लागवड करतात आणि मग ऊस तोडी साठी एकाच वेळी सर्व ऊस येतो म्हणून टप्प्याटप्प्याने ऊस लागवड केल्यास ऊस तोडणी सुद्धा त्या पद्धतीने येईल.

ऊस क्षेत्रामध्ये ए आय वापर करणे शक्य असून यामुळे यामुळे खताचा व पाण्याचा कधी वापर करायचा याची माहिती आपल्याला मिळणार आहे.

माधवराव कानवडे म्हणाले की ऊस आणि दूध हे शाश्वत पीक आहे शेतकऱ्यांनी पारंपारिक पद्धतीने ऊस पिक घेण्याऐवजी त्यामध्ये अत्याधुनिक पद्धतींचा वापर केला पाहिजे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कृषी अधिकारी भाऊसाहेब खराडे यांनी केले तर बाळासाहेब सोनवणे यांनी आभार मानले यावेळी परिसरातील शेतकरी ऊस उत्पादक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वांगदरी ग्रामपंचायत महाआवास घरकुल प्रकल्पाला राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार

### केंद्रीय ग्रामीण विकासमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते पुरस्काराचे पुण्यात वितरण

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

वांगदरी ग्रामपंचायतीने सहकार महर्षी नागवडे कारखान्याचे चेअरमन राजेंद्रदादा नागवडे व जिल्हा बँकेच्या संचालिका सौ. अनुराधा नागवडे यांच्या मार्गदर्शनाखाली उभारलेल्या महाआवास घरकुल प्रकल्पाला राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. पुण्यातील बालेवाडी क्रीडा संकुलात आयोजित शानदार सोहळ्यात केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे, विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, राज्यमंत्री योगेश कदम, माधुरी मिसाळ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी श्रीगोंदा पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी राणी फराटे, विस्तार अधिकारी मोशीन मालजपते, सरपंच संजय नागवडे आणि ग्रामविकास अधिकारी लक्ष्मण मुरकुटे उपस्थित होते. याप्रसंगी राजेंद्र नागवडे, उपसरपंच सौ. छाया मासाळ, माजी सरपंच आदेश नागवडे, महेश नागवडे, शिवाजी चोरमले, अशोक पारखे आणि ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.

पुरस्कार स्विकारल्यानंतर सरपंच संजय नागवडे यांनी सांगितले की, राजेंद्र दादा आणि अनुराधा नागवडे यांच्या विशेष प्रयत्नांनी महाराष्ट्र शासनाची ४० गुंठे जागा ग्रामपंचायतीकडे वर्ग करून घेण्यात आली. या जागेवर प्रधानमंत्री आवास योजनेतून ३६ स्लॅब घरकुले असलेला आदर्श प्रकल्प उभारण्यात आला. शासनाच्या निकषांचे काटेकोर पालन करून दर्जेदार काम पूर्ण करण्यात आले. प्रकल्पासाठी १ कोटी २० लाख रुपये खर्च झाले, ज्यापैकी ८५ लाख रुपये प्रधानमंत्री आवास योजना आणि गवंडी प्रशिक्षण योजनेतून मिळाले, तर २२.५ लाख रुपये पुण्याच्या रेल फॉर फाउंडेशनने दिले. उर्वरित रक्कम राजेंद्र



नागवडे आणि ग्रामपंचायतीच्या इतर फंडातून उभी करण्यात आली. या प्रकल्पाला पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, माजी मंत्री बबनराव पाचपुते आणि जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. यापूर्वी या प्रकल्पाला विभागीय स्तरावर द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला होता.

सरपंच संजय नागवडे यांनी सांगितले की, स्व. शिवाजीराव नागवडे यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत ग्रामपंचायतीने हा प्रकल्प यशस्वी केला. या पुरस्कारामुळे वांगदरी गावच्या वैभवात भर पडली असून, गावात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण आहे. हा पुरस्कार स्व. शिवाजीराव (बापू) नागवडे यांच्या चरणी समर्पित करत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. वांगदरी गावाच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# ग्रामपंचायतीच्या गैरकारभार प्रकरणी जोर्वे ग्रामस्थ आक्रमक

## गैरकारभाराची चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी । गटविकास अधिकारी यांना दिले निवेदन

**● संगमनेर । वीरभूमी –**

तालुक्यातील जोर्वे ग्रामपंचायत मधील मासिक सभा व ग्रामसभा यांतील अनियमितता व एप्रिल २०२२ ते मार्च २०२५ मधील १५ व्या वित्त आयोगातून विविध कामांमध्ये वस्तू खरेदीत झालेल्या गैरकारभार या विरोधात जोर्वे गावातील ग्रामस्थांनी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांचेकडे तक्रार दाखल केली आहे. तसेच याबाबत निवेदनही देण्यात आले आहे.

गटविकास अधिकारी यांना निवेदन देतेवेळी उपसरपंच बादशाह बोरकर, सदस्य दिगंबर इंगळे, किसन खैरे, हौशिराम दिघे, संदीप काकड, संगीता थोरात, सुनीता दिघे, पूनम खैरे, मंगल काकड, हौशीराम दिघे, जगन्नाथ दिघे, मुकेश काकड, बाबासाहेब बोरकर, सोपान कांदळकर, संजय थोरात, शेख हमीद, वसंत बोरकर, संतोष जाधव, कैलास इंगळे, बोरकर, सुनील थोरात, भाऊसाहेब दिघे, राहुल बोरकर, सुनील दिघे, भाऊराव बोरकर, विठ्ठल काकड, दत्तात्रय काकड, रावसाहेब काकड, संपत थोरात, बलसाने राजेंद्र, अमित थोरात, अण्णासाहेब थोरात, प्रशांत गायकवाड, डॉ. प्रवीण काकड, रमेश दिघे, अक्षय दिघे, राजेंद्र थोरात, सत्यजित थोरात, विठ्ठल काकड, दत्तु नाना काकड, वसंत बोरकर, राहुल बोरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या निवेदनात म्हटले आहे की, जोर्वे ग्रामपंचायतीचे गैरकारभार व भ्रष्टाचार तक्रार आपले सरकार पोर्टलवर १४ एप्रिल २०२५ रोजी केली असता ग्रामविकास अधिकारी यांनी उत्तरादाखल २५/०४/२०२५ सर्व माहिती जोर्वे ग्रामपंचायत मध्ये अर्जदार यांना पाहण्यासाठी उपलब्ध असल्याचा खुलासा केला. मात्र प्रत्यक्षात विचारणा केली असता कार्यालयीन कामकाज जास्त असल्याने दि. ३१ मे २०२५ नंतर माहीती उपलब्ध केली जाईल असे कळविण्यात आले.

याबाबत सातत्याने दिलेल्या अर्जाचा दोन महिने पेक्षा अधिकचा कालावधी होऊनही आपणाकडूनही कोणत्याही प्रकारची चौकशी केली जात नाही. ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत सदस्यांनाही विचारलेल्या कामांची माहिती लेखी व तोंडी मागणी करूनही दिली गेली नाही. दि. ३० मे २०२५ रोजी झालेल्या ग्रामसभेत विचारलेल्या प्रश्नांना दिशाभुल करणारी व चुकीची माहिती देवुन ग्रामसभेची दिशाभुल केली. सन २०२२/२३ तत्कालीन उपसरपंच गोकुळ दिघे व ग्रामविकास अधिकारी, यांनी बाकडे खरेदी ४ लाख १३ हजार रुपये, मेडीक्लोर औषध खरेदी २ लाख ४३ हजार रुपये व औषधं फवारणी व औषध खरेदी १ लाख ९६ हजार रुपये अशी एकूण जवळपास ८ लाख ५३ हजारांचा अपहार कागदोपत्री बोगस खरेदी बिलं दाखवुन केला आहे.

याचं कोणतंही उत्तर ग्रामसभेत मिळालं नाही. तसेच सन २०२४/२५ या आर्थिक वर्षात १५ व्या वित्त आयोगाच्या निधीवर सौ. प्रीती गोकुळ दिघे व ग्रामविकास अधिकारी यांनी लाखोंचा अपहार संगनमताने केला आहे. महीला सबलीकरणाच्या नावाखाली ४ लाख १२ हजार ५६० शिलाई मशीन खरेदी केल्याचे दिसत आहे. पण ग्रामपंचायत सदस्य यांना कोणत्याही प्रकारची खरेदी मासिक सभेत झाल्याची चर्चा नाही. लाभार्थी कोण आहेत, त्यांची निवड कशी व कधी केली. याची कोणतीही माहिती सरपंच व ग्रामविकास अधिकारी यांनी दिली नाही. वरील सर्व माहिती मेरी पंचायत या संकेतस्थळावर पाहील्यानंतर सदस्यांनी विचारना करुनही कोणतीही माहिती मिळाली नाही. अशाच प्रकारे जवळपास चार महीन्यांचा कालावधी उलटूनही १४ फेब्रुवारी २०२५ रोजी २ लाख ९९ हजार रुपये कचराकुंडी खरेदी केल्याचे आढळून आले आहे. त्यांचीही कागदोपत्री खरेदी दाखवुन अपहार झाला



आहे. त्याबाबत ग्रामसभेत विचारणां केली असता कचराकुंडी येणार आहे अशी निरर्थक उत्तरे ग्रामसभेला दिली.

नल-जलमित्र या नावाने १७ जानेवारी २०२५ रोजी ४९ हजार ५०० रुपये रक्कम ग्रामपंचायतीत कार्यरत असलेल्या पाणीपुरवठा कर्मचारी यांच्या ऐवजी तिसऱ्या व्यक्तिच्या खात्यावर रक्कम वळती केलेली आहे.

अशा प्रकारे सरपंच दोघेही पती पत्नी हे पालकमंत्री विखे गटाचे असुन सखोल निःपक्षपातीपणे चौकशी झाल्यास हा आकडा २५ ते ३० लाखाच्या आसपास जाण्याची शक्यता आहे. वरील सर्वच बाबींची चौकशी कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता तातडीने होणे अपेक्षित आहे. कोणतेही विकास कामं न करता माजी उपसरपंच गोकुळ दिघे व विद्यमान सरपंच सौ. प्रिती दिघे, गेल्या अनेक दिवसांपासून जोर्वेत कार्यरत असलेले ग्रामविकास अधिकारी पवार यांनी जोर्वे ग्रामपंचारतीचे अक्षरशः लचके तोडले आहेत. वास्तविकपणे केलेल्या तक्रारीची चौकशी एक महीन्याच्या आत होणे अपेक्षित असतांना जोर्वे ग्रामपंचायतीत झालेल्या अपहार व अनियमितता संदर्भात आपणाकडून संबंधितांना राजकीय दाबापोटी पाठीशी घातले जाऊ नये. संबंधितांकडून जोर्वे ग्रामस्थांना धमकाविण्याचे हाणामारी, दमदाटी शिवीगाळ असे प्रकार सुरू असुन कागदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. आपणाकडून सात दिवसाच्या आत वरील गैरव्यहाराची चौकशी न झाल्यास विद्यमान जोर्वे ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ पंचायत समिती संगमनेर येथे जन आंदोलन करुन उपोषणास बसणार आहे, असा इशाराही देण्यात आला आहे.

## आवास योजना प्रभावी राबविण्यात पाथर्डी पंचायत समिती प्रथम

**● पाथर्डी । वीरभूमी –**

महाआवास अभियान, धानमंत्री आवास योजना ग्रामीण), विभागात घरकुलाची ोजना तालुक्यात प्रभावीपणे ाबवून यशस्वी केल्याबद्दल ामीण विभागाच्या जिल्हास्तरीय थम क्रमांकाचा पुरस्कार पाथर्डी ंचायत समितीला आज पुण्यामध्ये मारंभपूर्वक प्रदान करण्यात ाला. अशा स्वरूपाचा पुरस्कार ंचायत समितीला प्रथमच मेळाल्याने कर्मचाऱ्यांनी व वेविध कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव ाजरा केला.

पुण्यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र डणवीस, केंद्रीय ग्रामविकास मंत्री शवराज सिंह चौहान, उपमुख्यमंत्री जित पवार, ग्रामविकास मंत्री यकुमार गोरे, राज्यमंत्री योगेश



कदम, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले आदींच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. सन २०२२, २०२३ या वर्षाच्या कामासाठी प्रथम पुरस्कार जाहीर झालेला आहे. गटविकास अधिकारी शिवाजी कांबळे, तत्कालीन गट विकास अधिकारी डॉ. जगदीश पालवे, विस्तार अधिकारी दत्तात्रय रानमळ, अभियंता प्रकाश पालवे, विनोद वारे व ग्रामविकास अधिकारी म्हस्के, घरकुल कक्ष समन्वयक ऋषीकेश पालवे, अभियंता रामेश्वर शिवणकर यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

याबाबत गटविकास अधिकारी शिवाजी कांबळे यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, दोन वर्षांपूर्वी झालेल्या घरकुलांच्या कामाबाबत तालुक्यात सर्वाधिक व दर्जेदार काम झाले आहे. ग्रामीण भागातील गरजू लोकांसाठी आवास योजनेची प्रभावी व दर्जेदार अंमलबजावणी करण्यात सर्व अधिकारी, कर्मचारी विशेषतः तत्कालीन गटविकास अधिकारी डॉ. पालवे यांचेही योगदान आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे, आ. मोनिका राजळे व आ. शिवाजी कर्डिले, आ. शिवाजी गर्जे यांचेही मार्गदर्शन लाभले. प्रथम क्रमांकाच्या पुरस्काराने संपूर्ण तालुक्याचा गौरव झाला आहे. चांगल्या कामाची दखल घेत शासनाने केलेला गौरव कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन व प्रेरणादायी ठरणार आहे. पाथर्डी पंचायत समितीचे सर्व अधिकारी व कर्मचारी विकास कामांच्या बाबतीत एका दिलाने काम करत शासनाच्या विविध योजना लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवत प्रामाणिक कार्य करीत आहेत.

## लॉजवर छापा; दोन तरुणांसह ४ महिला ताब्यात

**● शिर्डी । प्रतिनिधी–**

शिर्डी शहरात मंगळवारी सायंकाळी दोन लॉजवर छापा टाकून वेश्या व्यवसाय करणार्या दोन हॉटेल मालक तसेच दोन मॅनेजर यांच्यावर पिटा अंतर्गत कारवाई करत दोन तरुणांसह ४ महिलांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर देखील कारवाई केली आहे. शिर्डीतील अवैध गुन्हेगारी व वेश्या व्यवसाय मोडून समूह उच्चाटन करण्यासाठी जिल्हा पोलीस प्रमुख सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी सायंकाळी शिर्डी शहरातील मध्यवस्तीत असलेल्या हॉटेल सावता व हॉटेल बारकाबाई गेस्ट हाऊस वर वेश्याव्यवसाय चालत असल्याची माहिती गुप्त खबरीने शिर्डी पोलिसांना दिली. त्यानंतर ३ मे रोजी सायंकाळी उपविभागीय पोलिस अधिकारी शिरीष वमने व पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी एकाच वेळी दोन हॉटेलवर छापा मारला.

त्या ठिकाणी असलेल्या चार महिला व दोन तरुणांना पोलिसांनी ताब्यात घेतले. या प्रकरणात दोन्ही हॉटेल मालक व मॅनेजर असे एकूण चार व्यक्तींवर पिटा अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. शिर्डी शहरात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर देह व्यापार चालत असल्याच्या तक्रारी स्थानिक ग्रामस्थांनी पोलिसांकडे केलेल्या होत्या. त्या तक्रारींच्या अनुषंगाने यापूर्वी देखील शिर्डी पोलिसांनी विविध लॉजवर छापे टाकून गुन्हे दाखल केले होते. यापूर्वी देखील गुन्हे दाखल असलेल्या देह व्यापार करणार्या महिला या दोन्ही लॉज मिळून होत्या. त्यांच्यावर रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते. हॉटेल लॉजवर हे प्रकार सुरू होते त्या हॉटेल मालकावर देखील गुन्हे दाखल केले जाणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

पोलिसांच्या कारवाईची खबर लागताच शिर्डी शहरात ज्या हॉटेलवर अशा प्रकारचे व्यवसाय चालतात त्या हॉटेल लॉजधारकांमध्ये मोठ्या प्रमाणावर खळबळ उडाली. देह व्यापार करणार्या या महिलांना काही गुंड प्रवृत्तीचे तरुण आर्थिक फायद्यासाठी पाठबळ देत असल्याचे देखील पुढे आले आहे. अशा तरुणांचा शोध घेऊन त्यांच्यावर देखील पोलिसांकडून वेळप्रसंगी गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचे पोलीस उपाधीक्षक शिरीष वमने यांनी सांगितले. शिर्डी शहरात बसस्थानक, नगर-मनमाड रोड, पिंपळवाडी रोड या ठिकाणी या महिला रोडवर उभे राहून अश्लिल हावभाव करत असल्याच्या स्थानिक ग्रामस्थ व साईभक्तांकडून मोठ्या प्रमाणावर तक्रारी येत होत्या.

# संगमनेर-अकोलेचे नाते नावापुरते सख्खे व पक्के न ठेवता कायमचे ठेवायचंय

## आ. अमोल खताळ । अकोले विश्रामगृहावर नूतन पदाधिकाऱ्यांचा सन्मान सोहळा उत्साहात

**● अकोले । वीरभूमी –**

अकोले तालुक्याचा पाण्याच्या बाबतीत त्याग आहे, याची जाणिव कायम आहे. पठार भागातील पाणी प्रश्नावर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पा यांच्याशी चर्चा करुन प्रश्न मार्गी लावू तसेच यासाठी अकोलेचे लोकप्रतिनिधी आ. डॉ. लहामटे यांच्याशीही संपर्क झाला. दोघे मिळून प्रश्न मार्गी लावू हक्काचे पाणी पळवण्याचा कोणताही विचार नाही, असे स्पष्ट करत पूर्वीच्या आमदारांसारखे केवळ नावापुरते छोटा भाऊ व मोठा भाऊ हे नाते आपल्याला ठेवायचे नसून संगमनेर - अकोले हे सख्खे भाऊ म्हणून सख्खे व पक्के नाते ठेवायचे आहे असा माजी आ. बाळासाहेब थोरात व माजी मंत्री मधुकरराव पिचड यांचे नाव न घेता टीकात्मक टोला संगमनेरचे आमदार अमोल खताळ यांनी लगावला.

अकोले विश्रामगृह येथे तालुक्यातील शिवसेनेच्या जिल्हा व तालुका पदाधिकारी यांचा सत्कार व शिर्डी देवस्थान विश्वस्त डॉ. जालिंदर भोर यांच्या सन्मान सोहळ्याप्रसंगी आ. अमोल खताळ बोलत होते. यावेळी शिवसेना जिल्हाध्यक्ष कमलाकर कोते, शिवसेना उपजिल्हा प्रमुख मारुती मेंगाळ, तालुका प्रमुख सुशांत गजे, शहर प्रमुख सचिन शेटे, जगनशेठ देशमुख, आरोग्य विभागाचे ओएसडी. डॉ. अमोल भोर, संजय वाकचौरे, महेशराव देशमुख, बाळासाहेब भोर, गणेश पापळ, जावेद जाहगिरदार, सचिन भालेराव, वाल्मिक मैड, मा. नगरसेवक सुरेश लोखंडे आदी प्रमुख उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना आ. खताळ म्हणाले की, मी लहानपणापासून पाहत आलोय की, अकोले तालुक्यात शिवसेना व स्व. बाळासाहेब ठाकरे व ना. एकनाथ शिंदे साहेब यांच्या विचाराचे शिवसैनिक जास्त आहेत. मा. मुख्यमंत्री व विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे फॅमिली डॉक्टर असलेले अकोलेचे भुमिपुत्र डॉ. जालिंदर भोर यांनी तालुक्यातील तरुणांना, जुन्या नव्या शिवसैनिकांना एकत्रित करत काही दिवसांपूर्वी ठाणे येथे ना.एकनाथ शिंदे साहेब यांच्याहस्ते मोठा शिवसेना पक्ष प्रवेश सोहळा पार पडला. यावेळी ना.शिंदे साहेब यांनी अकोलेकरांना अश्वासित केले आहे. राज्यात आजपर्यत कोणत्याही नेत्याकडुन झाले नाही एवढे काम ना. एकनाथ शिंदे साहेब यांनी केले आहे. सुरूवातीला संगमनेर शिवसेनेच्या अवस्था बिकट होती. त्यावेळी म्हणत होते शिवसेनेचे पदाधिकारी हे संगमनेरचा कॉग्रेसचा नेता ठरवत होता. परंतु ना. एकनाथ शिंदे यांच्यामुळे परिस्थिती बदलली.

अकोले तालुका आदिवासी, गोरगरीब डोंगरदऱ्याचा तालुका आहे. येथे संजय गांधी निराधार योजनेचे काम मोठ्या प्रमाणात होणे गरजेचे आहे. मी गेली काही वर्षे या योजनेचे काम करुन संगमनेरातील लोकांना लाभ मिळवून दिला आहे. त्यामुळे मला अनुभव आहे. गरज भासल्यास मला कधीही संपर्क करा. शिवसैनिकानो आता ना. शिंदे साहेबांची ताकद तुमच्या पाठिशी आहे, कामाला लागा. आपल्या महायुतीचे सरकारच्या योजना तळागाळात पोहचवा. प्रत्येक गाव, वाडी वस्तीवर योजना आपल्या महायुतीचे सरकारची, शिवसेनेची आहे हे समजावून सांगा. येत्या काही दिवसांत जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुका येत आहे. आपले उपजिल्हा प्रमुख मारुती मेंगाळ यांना पंचायत समितीचा चांगला अनुभव ही आहे त्यामुळे या निवडणुकीत मागे पडायचे नाही. याबाबतीत महायुतीचे बाबत वरिष्ठ निर्णय घेतील. मात्र स्थानिक पातळीवरचे प्रश्न वरिष्ठांपर्यत पोहचवायचे.

आपण संगमनेर येथे संपर्क कार्यालय



सुरु करत आहे हे कार्यालय संगमनेर अकोले विभागातील लोकांची प्रश्न सोडवण्यासाठी कार्यालय राहणार असुन या कार्यालयाचे उद्घाटन ना. एकनाथ शिंदे याचे हस्ते लवकरच होणार असुन या कार्यक्रमाला सगळ्यांनी उपस्थित राहावे असे अवाहन आ. खताळ यांनी केले.

यावेळी डॉ. जालिंदर भोर म्हणाले, मुख्यमंत्रीचा फॅमिली डॉ. ही पदवी कोणत्याही पदापेक्षा मोठी आहे ही पैसे अथवा काहीही देवून मिळत नाही. मी ४० वर्षापासून वैद्यकीय सेवा देण्याचे काम ठाण्यात अविरत करत आहे. ना. शिंदे साहेब यांनी आपल्यावर मोठी जबाबदारी टाकली आहे. संगमनेर व अकोलेचे आमदार आपले महायुतीचे आहेत. ठाण्यात २६ तारखेला मोठा पक्षप्रवेश केला. त्यावेळी ना. शिंदे साहेबांनी सांगितले की मी मोठे ऑपरेशन केले. परंतु मी ऑपरेशन केले त्यानंतरची काळजी आता तुम्हाला घ्यायला हवी. शिवसेना पक्षात नविन सदस्य वाढवावी. पक्ष वाढीसाठी काम करावे. मागील काळात काहींनी स्वतःचे वाढीसाठी काम केले, पक्ष वाढीसाठी काम केले नाही. आता तसे चालणार नाही. ना. शिंदे साहेबांना आनंद होईल, असे काम माझ्या तालुक्यात झाले पाहिजे. तुम्हाला कसलीही अडचण आली तर मला संपर्क करा, असे अवाहन डॉ. भोर यांनी केले.

यावेळी शिवसेना जिल्हाध्यक्ष कमलाकर कोते म्हणाले की, ब्राम्हणवाडा येथील शहीद जवान संदीप गायकर यांच्या कुटुंबाला घर बाधून देण्याचा शिवसेनेचा संकल्प आहे. या अकोले मतदारसंघात आमदार शिवसेनेचा होउ शकतो. येत्या काळात जि.प.व पं.स. निवडणुकीत चांगले काम करा, असे अवाहन केले.